Research Papers

# माझा रशियाचा प्रवास : भारत आणि रशिया यामधील तुलनात्मक समाजवास्तव

डॉ. सौ. सविता अशोक व्हटकर
एम. ए. पीएच. डी ( सेट) अधिव्याख्याता
भोगावती महाविद्यालय, कुरुकली
ता . करवीर , जि. कोल्हापूर

## प्रस्तावना :–

1971 मध्ये रशियात समाजवादी क्रांती झाली. या समाजवादी क्रांतीचा अनेक देशांवर प्रभाव पडला . कॉ. लेनीन यांनी समाजवादी क्रांती घडवून आणली. लेनीन यांच्या समाजवादी क्रांतीमुळे रशियामध्ये कुठेच साम्राज्यवाद अथवा भांडवलदार वर्ग पहायला मिळणार नाही या समाजवादाचे वारे भारतात पोहोचले ते प्रथम मुंबईत .

वाळवा तालुक्यातील छोटयाशा वाटेगावाहून अण्णा भाऊ साठे हे आपल्या आई वडिलांबरोबर मुंबईला आले. मिळेल ते काम करत ते गिरणीकामगार झाले . गिरणी कामगार म्हणून काम करत असताना मुंबईतील गिरणी कामगार आणि भांडवलदार यांच्यातील दरी अण्णा भाऊनी अनुभवली. त्यावेळी त्यांचा कम्युनिस्ट पक्षाच्या कार्यकर्त्याशी संबंध आला. कामगारांच्या प्रश्नावर अण्णा भाऊंनी आंदोलने करण्यास व मोर्चे काढण्यास सुरुवात केली. तसेच त्यांनी मुंबईचा गिरणी कामगार हा पोवाडाही लिहिला. या कामगार चळवळीत काम करताना रशियन राज्यक्रांतीचा इतिहास आणि कॉ. लेनिनचे चरित्र वाचतात. त्याचे मनन चिंतन करतात रशियातील क्रांतीचा खोलवर परिणाम अण्णा भाऊंच्या प्रतिभा शक्तीवर होतो.

अण्णा भाऊंचा जन्म दारिद्रयात झाल्याने दारिद्रयाची दाहकता किती धगधगती असते हे त्यांना माहित आहे या दारिद्रयाची मुळे त्यांनी शेधण्याचा प्रयत्न केलेला आहे . अण्णा भाऊ आपल्या साहित्यातून समाजातील अनेक वास्तव प्रश्नांची मांडणी करतात . अण्णांनी लिहिलेल्या स्टॅलिनग्राडच्या पोवाडयाने रशियन जनता भारावून जाते. समतेची भूमिका घेवून लिखान करणाऱ्या 'इंडोव्हीएट कल्चर सोसायटी'च्या वतीने रशियाला निमंत्रित केले . अण्णांची रशिया पाहण्यांची प्रबळ इच्छा या रशियाच्या निमंत्रणामुळे पूर्ण होते . अण्णा भाऊ रशियाला भेट देऊन आल्यावर त्यांनी 'माझा रशियाचा प्रवास' हे प्रवासवर्णन लिहिले. या प्रवासवर्णणामध्ये अण्णा भाऊंनी भारतीय आणि रशियन समाजाची तुलना बऱ्याच प्रसंगातून केलेली आहे . त्या निमिताने भारतीय समाजातील समाजवास्तव कशा प्रकारचे आहे हे पहावयास मिळते. हे समाजवास्तव पुढील प्रमाणे पाहता येईल .

भारत हा असा देश आहे की, इथे वर्णव्यवस्था नांदताना दिसते . तर जगातील इतर देशांमध्ये वंशभेद व वर्णभेद असल्याचे दिसून येते . हे प्रथम मान्य केले पाहिजे . भारतामध्ये वर्णव्यवस्थेवर आधारित असलेली समाजव्यवस्था आर्यांच्या आगमनापासून ते आजतागायत कायम चालू आहे . युरोप खंडामध्ये औद्योगिक क्रांतीमुळे वर्गवाद निर्माण झाला . कॉम्रेड लेनिन यांनी कार्ल मार्क्स यांच्या वैचारिक साहित्याचा अभ्यास करुन रशियामध्ये समाजवादी क्रांती घडवून साम्राजवादाचा पाडाव केला . या समाजवादी क्रांतीतील रशियन जनतेचे योगदान महत्वाचे आहे . यामुळे रशियातील समाजवादी समाजरचना दिसते . केवळ पंचेचाळीस वर्शात संपूर्ण रशियाला समाजवादी करुन टाकले .

1950 पासून स्वतंत्र भारताने संविधान स्वीकारले या संविधानाद्वारे भारतातील सर्व व्यवहार सनदशीर मार्गाने सुरु होतात . ब्रिटीशांच्या गुलामगिरीतून बाहेर पडलेल्या भारतीय नागरिकांना हे संविधान स्वातंत्र्य, समता, न्याय आणि बंधुता ही चतु:सुत्री बहाल करते .'रशियानं आपल्या देशात जुन्या इतिहासाच्या भरवशावर समाजवादी राज्यक्रांती घडवून जगात एक नवा इतिहास निर्माण केला . आणि या नव्या इतिहासासाठी तेथील जनतेनं सतत 40 वर्शे लढून आपल्या प्राणांची आहुती दिली'1. याची जाणीव रशियन जनता ठेवते आणि आपल्या देशात समाजवाद रुजवते . तसेच आपल्या कृतीने प्रत्येकाला स्वंतत्र विचाराने, समतेने वागण्यास व वागविण्यास शिकवते . परंतु आपल्या भारतात मात्र स्वातंत्र्य मिळून साठ वर्शे उलटून गेले तरी देखील इथल्या समाजावर अजूनही वर्णव्यवस्थेचा पगडा असल्याचे दिसून येते .

भारतीय संविधानानुसार प्रत्येक भारतीय नागरिकाला भारतीय संविधानाने स्वातंत्र्य,समता, न्याय आणि बंधुता ही मुल्ये बहाल केली आहेत . म्हणजेच इथला भारतीय नागरिक खऱ्या अर्थाने स्वतंत्र आहे . तरीही स्वातंत्र्याला बंदिस्त करुन ठेवलेले आहे . कारण अण्णा भाऊ भारताच्या संविधानाच्या स्वीकृतीनंतर रशियाला जाण्यासाठी दोनवेळा पासपार्टची मागणी करतात पण त्यांना पासपोर्ट मिळत नाही . तत्कालीन राज्याचे मुख्यमंत्री अण्णा भाऊंना खाजगीत

*Indian Streams Reserach Journal*
*Vol.2,Issue.I/ Feb; 2012*

बोलावून पुढील शब्दात समजावतात 'बाबा तू आमचा वैरी आहेस . खरोखरी सांगतो की, आम्ही खूप चांगली माणसं आहोत म्हणून तू बाहेर आहेस नाहीतर तुझी जागा तुरुंगात .... ' या मुख्यमंत्र्यांच्या बोलण्याने या देशात खरोखर लोकशाही नांदते का?हा यक्ष प्रश्न पडतो . राज्याच्या मुख्यमंत्र्यांकडून एका लेखकाला अशा प्रकारची भाशा ऐकावी लागत असेल तर सामान्य नागरिकांचे स्वातंत्र्य धोक्यात असल्याचे सूचित होते .त्याचबरोबर इथला अस्पृश्य मोठा होऊनये हा मुख्य हेतू दिसून येतो . या देशात माणसापेक्षा जातीला महत्त्व देणारी माणसं आपली बूज राखून कशी आहेत याचे दर्शन मुख्यमंत्र्यांच्या विधानावरुन जाणवते .

रशियाला निघताना त्यांना हयांच्याबरोबर असणाऱ्या पाच सहकाऱ्याकडून सहकाऱ्याची वागणुक मिळते . यावरुन भारतीय माणसांची स्वातंत्र्याकडे बघण्याची दृश्टी कशी अमानवी आहे याचे अण्णा भाऊ चित्रण करतात . अशा प्रसंगातून भारतीय समाजातील मानवता नश्ट झालेली दिसून येते . चित्तोडकी महाराणी या विमानात अण्णा शेवटचा प्रवास करुन दाखल होतात त्यावेळचा प्रसंग अण्णा पुढील शब्दात व्यक्त करतात .'हा एक महामुर्ख आहे बर का,असा त्यांचा चेहरा बोलला . मी आपल्या गुमान विमानात बसलो . कुणी माझी दाद घेतली नाही . रंग काळा, पोशाख साधा,गळयात टॉय नीट नाही . मग मला शहाना कोण म्हणणार' परंतु त्याच विमानात असलेले सिलोनचे प्रतिनिधी होते ते अण्णांना ओळखतात . अण्णा ताश्कंदपर्यंत त्या सिलोनी मित्रात वावरतात तेव्हा कुठे भारतीयांना त्यांची दाद घ्यावीशी वाटते .

अण्णा भाऊ 'ताश्कंद' मध्ये दिलाराम नाटक पाहण्यासाठी जातात . ते थिएटर जवळ उशीरा पोहचतात त्यामुळे त्यांना अण्णाभाऊंना आणि त्यांच्या सहकाऱ्यांना तिकिट मिळत नाही . हे त्या थिएटरमध्ये बसलेल्या रशियन प्रेक्षकांना समजते तेव्हा त्या थिएटरमधील आठ प्रेक्षक स्वतःहून उठून बाहेर येतात आणि आपली तिकीटे भारतीय पाहूण्यांना देवून ते निघून जातात . यातून रशियन माणसाकडे माणूसकी कशी आहे याचे दर्शन होते . या अनुशंगाने अण्णा भाऊ आपला अनुभव सांगताना म्हणतात, 'रशियन महान साहित्यिकांना रशियन लोकांनी अजरामर करुन ठेवले आहे . कित्येक मार्गांना, चौकांना कलावतांची नावं दिली आहेत नि त्यांचे भव्य पुतळे उभे केले आहेत. त्यांचचं साहित्य आणि इतिहास या दोन गोश्टी अगदी हातात हात घालून जागोजाग उभ्या आहेत. टॉलस्टॉय, पुश्कीन, गॉर्की,मायकोव्हस्की ही नावं सजीव झाली आहेत .'2 कलावंताना प्रोत्साहन मिळते. रशियन सरकार कला जिवंत ठेवण्यासाठी लाखो रुबल खर्च करते . रश्यिन सरकारच्या या धोरणामुळे रशियन कलावंत आपल्या कलेत जीव ओतून कला जिवंत ठेवण्यासाठी कश्ट करतात . रशियन कलावंत आपली कला सादर करतो तेव्हा प्रेक्षकांमधून त्या कलावंताचा टाळयांच्या गजरात स्वागत होते . आपले सादरीकरण झाल्यानंतर रशियन कलाकारांना पुन्हा प्रेक्षकांसमोर यावे लागते . त्या आलेल्या सर्व कलाकारांचे प्रेक्षकांकडून पुन्हा एकदा टाळयांच्या एका लयीमध्ये कौतुक केले जाते . या टाळयांच्या या दीर्घ गजरामुळे रशियन कलाकार सुखावतात . अशा प्रकारे कलावंतांच्या कलेचा गौरव व सन्मान प्रेक्षकांकडून होतो . पण भारतीय कलावंताला, साहित्यिकाला खुद्द मुख्यमंऱ्याकडूनच संचारबदी घालण्यात येते . कलावंताच्या स्वातंत्र्यावर जीथे गदा आहे तिथे कलावंताच्या कलेचा सन्मान आणि गौरव होणे दुरच . हे भारतीय समाजातील वास्तव समोर येते .

रशियातील अनेक शाळा महाविद्यालये आणि विद्यापीठे यांना भेटी दिल्या . तिथल्या अनेक विद्यार्थ्यांना, शिक्षकांना भेटी दिल्या पण शिक्षकांकडे अण्णा भाऊ रशियातील निरक्षरतेविशयी चौकशी करतात . निरक्षरतेचे प्रमाण सांगताना श्क्षिक म्हणतो –

'असेल की सात टक्के'

हे सात टक्के का राहून गेले?या प्रश्नाचे उत्तर आपल्या भारतीयांना विचार करावयास लावणारे आहे. हे रशियन शिक्षण सांगते .

हे सात टक्के अडाणी आहेत त्याचं कारण त्यांना चालता येत नाही, काही लोक पाळण्यात आराम करीत आहेत , तर काही आईच्या पोटात आहेत . रशियातील ही निरक्षरता पाहिल्यास साक्षरतेचे प्रमाण किती झपाटयाने विकसित झालेले आहे हे दिसते. भारतामध्ये लोकशाही असून देखील शिक्षणाचे प्रमाण रशियापेक्षाही खूपच कमी आहे . रशियाची साक्षरता ही शिक्षणातूनच दिसते असे नाही तर रशियातील स्वच्छ रेल्वे स्टेशन, स्वच्छ रस्ते , तिथल्या बागा आणि तिथे उभे केलेले पुतळे या सर्व गोश्टीतून साक्षरतेचे प्रत्यय येते . केवळ लिहिता वाचता येणे म्हणजे साक्षरता नव्हे हे रशियातील रस्त्यांवरुन, रेल्वे स्टेशनवरुन पहावयास मिळते.

भारत एकवीसाव्या शतकात वावरत असताना भारतीय स्त्रियांना पुरुशांच्या बरोबरीने हक्क मिळविण्यासाठी झगडावे लागते . भारतात लोकशाही असून भारतीय स्त्रियांना समान हक्क मिळत नाहीत . पण रशियातील प्रत्येक कर्मचारीच आपल्या देशाच्या विकासासाठी एक क्षणही वाया जावू देत नाही . त्यासाठी त्यांनी आपल्या सप्तवार्शीक योजनेत उत्पादनातील अंदाधुदीऐवजी शास्त्रशुध्द अर्थव्यवस्थेचे नियोजन केलेले आहे .त्यामुळेच मास्कोचं अल्पावधीत एका उच्चस्तरीय उद्योगप्रधान शहरामध्ये रुपांतर केलेले आहे . त्याचप्रमाणे तेथील तंत्रशास्त्रीय क्षेत्रात, साहित्य क्षेत्रात आणि कला क्षेत्रात यश संपादन करुन देशाला वैभव प्राप्त करुन दिलं आहे . रशियन क्रांतीनंतर लोकांनी प्राणपणाने आणि राश्ट्रविकासाच्या निर्धाराने नवजीवनाच्या उभारणीस सुरुवात केली . एकूण रशियन जनता आपल्या देशाच्या भविश्याकाडे आत्मविश्वासानं पाहत असल्यामुळे ते राश्ट्र जगाच्यापाठीवर एक आदर्श राश्ट्र बनले आहे . रशियामध्ये रशियन सरकार स्त्रीयांना न मागताच सर्व हक्क बहाल करते . उझबेकिस्थानातील बुरखा पध्दती नाहीशी झालेली आहे . कारण उझबेकीस्थान या राश्ट्राच्या अध्यक्षपदावर स्त्रियांनाही स्थान असते . सोव्हीएत मध्ये बालकांना जन्म दिलेल्या स्त्रीची काळजी देखील रशीयन सरकार घेते . एकूणच रशीयन सरकार स्त्रीयांच्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतीक, आर्थिक उन्नत्तीसाठी कटीबध्द असल्याचे दिसते .

रशीयन जनतेमध्ये प्रामाणिकपणा ठासून भरलेला आहे . रशीयात अण्णांचा कॅमेरा हरवतो, मद्रासच्या जेकबचे गिटार हरवते, रामायण गायब होते पण या सर्व वस्तू ज्या त्या व्यक्तींना परत मिळतात . हीच गोश्ट भारतात घडली तर आणि 'म्हणूनच अण्णा भाऊ रशियात जे जे पाहतात ते एक अभ्यासक म्हणून चिकित्सक नजरेने पाहतात . आणि ते लगेच त्या घटनेची भारतातील घटनेशी तुलना करतात . त्यातील विसंगती शोधतात नि त्यावरचे आपले प्रतिभाशाली मत व्यक्त करतात, जे एक जीवनतत्व म्हणून समोर येते'.3 भारतीय नागरीकाकडून रशियातील नागरिकाप्रमाणे प्रामाणिकपणाचे दर्शन झाले नसते पण रशीयन नागरिकांकडून हा प्रामाणिकपणा दिसून येतो.

सारांश :

भारताप्रमाणे रशियामध्ये दुःख ,दारिद्रय,दैन्य या गोश्टी शोधूनही सापडत नाहीत . असे अण्णांच्या 'माझा रशियाचा प्रवास' या प्रवास वर्णनात आढळते. रशियात साम्यवाद आहे. या साम्यवादामुळे प्रत्येक व्यक्तीची सामाजिक,शैक्षणिक, राजकीय आणि सांस्कृतिक दृश्टया विकास झालेला दिसतो . भारतामध्ये भारतीय माणसाकडूनच भारतीय माण्साला मिळणारी अमानवी वागणूक, कलावंताची होणारी हेटाळणी,स्त्रीयांना दिले जाणारे दुय्यम स्थान या व अशा अनेक गोश्टीतून भारतीय समाजाची भयान वास्तवता या भारत आणि रशिया यामधील तुलनात्मक समाजवादाच्या निमित्ताने पहावयास मिळते .

**Please cite this Article as :** *डॉ. सौ. सविता अशोक व्हटकरे ,माझा रशियाचा प्रवास : भारत आणि रशिया यामधील तुलनात्मक समाजवास्तव* **: Indian Streams Research Journal (Feb ; 2012)**

संदर्भ :
1 . नानासाहेब कठाळे : 'अण्णाभाऊ साठे जीवन आणि साहित्य',समता सैनिक दल
प्रकाशन, दुसरी आवृत्ती 2001,पृ. 47 .
2 . अण्णा भाऊ साठे :'माझा रशियाचा प्रवास',सुरेश एजन्सी प्रकाशन, सातवी
आवृत्ती 2009, पृ. 25 .
3 .मच्छिंद्र सकटे : 'अण्णाभाऊ साठे एक सत्यशोधक' प्रज्ञा प्रकाशन कोल्हापूर,
प्रथम आवृत्ती 2005,पृ. 137 .

**Please cite this Article as :** *डॉ. सौ. सविता अशोक व्हटकरे*, *माझा रशियाचा प्रवास : भारत आणि रशिया यामधील तुलनात्मक समाजवास्तव* : **Indian Streams Research Journal (Feb ; 2012)**